क्र.मनपा/नसवि/२/विस/ ०२ /२०१९-२०२०
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २८ / ०८ /२०१९

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०२ /२०१९-२०२०

## महानगरपालिकेच्या विशेष सभेची नोटीस

प्रति,
मा.......................................................................................

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्यां तरतुदी नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **बुधवार दि.०४/०९/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता** पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय सांगली येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) अन्वये मा.स्थायी समिती ठराव क्र.८० दि.०६/०८/२०१९-२०/०८/२०१९ अन्वये निवृत्त झालेल्या आठ सदस्यांच्या जागी अधिनियमातील कलम २०(५) अन्वये त्या-त्या पक्षाच्या निवृत्त झालेल्यां सदस्यांचे जागी आठ सदस्यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे** विषयपत्र.

२. महानगरपालिका क्षेत्रामध्ये आलेल्या पुरपरिस्थितीबाबत उपाय योजना व चर्चा करणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- (विस) ०२** दिनांक :- ०४/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ४४

विषय क्रमांक :- ०१

---

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.२६/०८/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१८ मध्ये होवून, सार्वत्रिक निवडणूकीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (२) अन्वये सोळा सदस्यांची महासभा ठराव क्र.५१ दि.१०/०९/२०१८ अन्वये अधिनियमातील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार स्थायी समितीवरील सोळा सदस्यांची नियुक्ती होवून, स्थायी समिती अस्तित्वात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३) अन्वये महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारनंतर स्थायी समिती वरील निम्मे सदस्य निवृत्त होतील. या तरतुदीनुसार स्थायी समिती वरील आठ सदस्य दि.०१/०९/२०१९ रोजी दुपारनंतर निवृत्त झाले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) नुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.८० दि.०६/०८/२०१९-२०/०८/२०१९ अन्वये निवृत्त झालेल्या आठ सदस्यांच्या जागी अधिनियमातील कलम २०(५) अन्वये त्या-त्या पक्षाच्या निवृत्त झालेल्या सदस्यांचे जागी आठ सदस्यांची नियुक्ती करणेस विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला असता, प्रस्तुत कामी अधिनियमातील तरतुदीनुसार त्या-त्या पक्षाच्या निवृत्त झालेल्या सदस्यांचे जागी आठ सदस्यांची नियुक्ती करणेसाठी त्या-त्या पक्षाच्या गटनेते यांनी दिलेल्या लेखी पत्राद्वारे खालील सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.मोहना वासुदेव ठाणेदार | भारतीय जनता पार्टी |
| २) | मा.अनारकली जमीर कुरणे | भारतीय जनता पार्टी |
| ३) | मा.राजेंद्र लक्ष्मण कुंभार | भारतीय जनता पार्टी |
| ४) | मा.गजानन रामू मगदुम | भारतीय जनता पार्टी |
| ५) | मा.मंगेश मारुती चव्हाण | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| ६) | मा.प्रकाश शामराव मुळके | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| ७) | मा.शेडजी सुबराव मोहिते | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ८) | मा.मालन चंद्रकांत हुलवान | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |

उपरोक्त प्रमाणे नोंद घेवून योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर

अनुमोदक :- मा. अजिंक्य पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगरसचिव लिपिक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- (विस) ०२** दिनांक :- ०४/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ४५

विषय क्रमांक :- ०२

---

महापालिका क्षेत्रामध्ये संभाव्य पुरपरिस्थिती उद्भवल्यावर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राकरीता यंत्रासामुग्री व इतर अनुषंगिक साधन सामुग्री साहित्य खरेदीच्या खर्चास तज्ञ सल्लागार / PMC नेमुन आराखडा तयार करणे, हा आराखडा निधी मागणीसाठी मा.शासनास सादर करणेस ही सभा आदेश देत आहे तसेच आपत्तीव्यवस्थापनामध्ये महापालिका क्षेत्रामध्ये माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये आलेल्या पुरपरिस्थिती मधील सन २०१९-२० या सालातील पुरपट्टयाने बाधीत झालेल्या नागरिकांची घरपट्टी, पाणीपट्टी व विजबिल माफी देणेस मा.शासनास प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

Y. S Bawadekar

सूचक :- मा. श्री. युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- मा. श्री धिरज चंद्रकांत सूर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

कर निर्धारक संकलन अधिकारी / कार्यकारी अभियंता - पाणीपुरवठा / विद्युत अभियंता

नगरसचिव
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका